दूरध्वनी: २५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**महानगरपालिका भवन डॉ. अल्मेडा रोड, पाचपाखाडी, ठाणे - ४००६०२**

संदर्भ क्र./ठामपा/वृप्रा/वृअ- १६१४ दिनांक: ०५/१०/२०१७

वृक्षप्राधिकरण

<u>जाहीर सूचना</u>

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८ (३ क) अन्वये या जाहीर सूचनेद्वारे सुचित करण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दितील अर्जदार निहाय खालील नमुद वृक्ष तोडणे/ पुनर्रोपण करणेकरीता प्राप्त अर्जावर वृक्षप्राधिकरणामार्फत कायद्यातील तरतुदीनूसार निर्णय घेण्यात येणार आहे. या संबंधात काही हरकत/आक्षेप/सूचना असल्यास सदर सूचना लेखी स्वरुपात ठाणे महानगरपालिका नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, प्रशासकीय भवन, डॉ.अल्मेडा रोड, पाचपाखाडी, ठाणे (प.) येथे जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती सूचनांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | अर्जदार | विषय |
|---|---|---|
| १. | श्री. अनिरुध्द सोमन, नौपाडा, ठाणे. | श्री. अनिरुध्द सोमन, नौपाडा, ठाणे. यांच्या अर्जानुसार गंगानिवास, रामवाडी, नौपडा, ठाणे प. येथील धोकादायक सुकलेले ०१ वृक्ष तोडणेबाबत. |
| २. | मे. न्यु शिवालय को.ऑ.हौ.सो., ठाणे. | मे. न्यु शिवालय को.ऑ.हौ.सो., यांच्या अर्जानुसार नामदेवाडी, पांचपाखाडी, ठाणे येथील धोकादायक ०२ वृक्ष तोडणे / पुनर्रोपणबाबत. |
| ३. | मे. सचिव अमेय इलेगन्स को.ऑ.हौ.सो., ठाणे. | मे. सचिव अमेय इलेगन्स को.ऑ.हौ.सो., यांच्या अर्जानुसार अमेय इलेगन्स, वसंत विहार शाळेजवळ, प्राची हॉस्पिटल लगत, ठाणे प. येथील धोकादायक ०२ वृक्ष तोडणेबाबत. |
| ४. | श्री. नंदकुमार नारायण पाटील, कळवा, ठाणे. | श्री. नंदकुमार नारायण पाटील, कळवा, ठाणे. यांच्या अर्जानुसार जिवदानी बिल्डींग, न्यु कळवा हायस्कुल जवळ, कळवा, ठाणे येथील धोकादायक ०४ वृक्ष तोडणे / पुनर्रोपणबाबत. |
| ५. | मे. टाटा ग्लेन्डल को.ऑ.हौ.सो.लि., ठाणे प. | मे. टाटा ग्लेन्डल को.ऑ.हौ.सो.लि., ठाणे प. यांच्या अर्जानुसार ग्लॅडी अल्वारीस रोड, पोखरण रोड नं. २, ठाणे प. येथील धोकादायक ०२ वृक्ष तोडणेबाबत. |

(केदार पाटील)
वृक्ष अधिकारी,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिका,

वृक्षप्राधिकरण

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८ (३) अन्वये

## जाहीर सूचना

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखडयानुसार इमारत बांधकाम परवानगी देण्यास सक्षम प्राधिकरण / शहर विकास विभागाने अर्जदार मे. पिरामल इस्टेट प्रा.लि यांच्या मौजे बाळकुम या ठिकाणावरील इमारत बांधकामाच्या प्रस्तावास विकास प्रस्ताव क्र. एस०५/००६८/१३ दि.१/०८/२०१७ अन्वये Commencement Certificate देण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, अर्जदार यांनी विकास प्रस्तावांतर्गत मंजुर नकाशे / आराखडे यामधील नियोजित इमारतीच्या बांधकामात बाधित होणा-या वृक्षांपैकी जे वृक्ष तांत्रिकदृष्टया पुनर्रोपण करणे शक्य असणारे वृक्ष पुनर्रोपण करणे व तांत्रिकदृष्टया पुनर्रोपण करण्यास अशक्य असणारे वृक्ष तोडणे याकरीता वर नमूद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये वृक्षप्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर केला आहे.

ज्याअर्थी, वृक्षप्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ दिवस कालावधीमध्ये हरकती तथा सुचना मागविण्याचे सुचित केले आहे.

त्याअनुषंगाने वर नमूद अर्जदार यांनी विकास प्रस्ताव अंतर्गत बाधित ०८ वृक्ष पुनर्रोपण करणे व १७ वृक्ष तोडणे या अर्जाच्या अनुषंगाने सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी हरकती तथा सूचना असल्यास लेखी स्वरुपात ठाणे महानगरपालिका नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, प्रशासकीय भवन, डॉ.अल्मेडा रोड, पाचपाखाडी, ठाणे (प.) येथे जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती तथा सूचनां ग्राहय राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(केदार पाटील)
वृक्ष अधिकारी,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.